# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र. ७५५/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १९/११/२०१६

**१) सार्वजनीक ठिकाणी अश्लिल शब्दात शिविगाळ करुन असभ्य वर्तन करतांनी मिळुन आल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक १७/११/२०१६ रोजी १९.०० वा दर. यातील आरोपी हा दारुचे नशेत सार्वजनीक ठिकाणी बाजार चौकात हजर असलेल्या लोकांन समोर आमदार चरण वाघमारे यांचे नाव घेवुन अश्लिल शब्दात शिविगाळ करुन आमदारास कापुन फेकीन अशी धमकी देवुन सार्वजनीक ठिकाणी धुमधाम करुन असभ्य वर्तन करुन शांतता भंग करीत असतांनी मिळुन आल्याने फिर्यादी जगदीश मारोती ऊके वय ४० वर्ष रा. जांम यांचे व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन आंधळगाव येथे कलम २९४,५०६ भादंवि. सहकलम ८५(१) मदाका सहकलम ११०,११७ मपोका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. केने पो.स्टे. आंधळगाव हे करीत आहेत.

**२) अल्पवयीन मुलीस फसवणुक करुन स्वता: मरुन जाण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक ३०/०९/२०१६ ते ०३/१०/२०१६ रोजी १४.०० वा. यातील आरोपीने फिर्यादी सोबत स्वत:चे सेल्फी फाटो काढुन ती फोटो गावात व शाळेत दाखवुन तिच्या लज्जेस धोका पोहचेल असे कृत्य करुन फिर्यादीला मी स्वत: जहर खावुन मरुन जाईन व तुला फसविन अशी धमकी दिल्याने फिर्यादींचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन आंधळगाव येथे कलम ५०९ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. भगत पो.स्टे. आंधळगाव हे करीत आहेत.

**३) मोटार वाहन कायद्याखाली कारवाई. :—**

दिनांक १८/११/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायद्याखाली ८३ प्रकरणांची नोंद कण्यात आलेली असून त्यापैकी तिन सिटर वाहनांवरती ०३ केसेस, अवैध प्रवासी ०१ व ईतर वाहनांवरती ७९ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र. ९९२१७४१६८१

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.